महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर-४४० ००१
दुरध्वनी क्र.इ.पी.बी.एक्स.०७१२-२५६५४०३/२५६०२०९/२५५३४०१/२५५३३६०फॅक्स-२५६१७७५
Email : nagpur@msbshse.ac.in chavansk65@gmail.com

तातडीचे/कालमर्यादीत

पत्र क्रमांकः नाविमं/मागो/5872
नागपूर दिनांकः19/12/2017

प्रति,

मुख्याध्यापक

............................................

............................................

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०१८ करिता परीक्षक /नियामकांच्या नियक्ती बाबत.....

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०१८ करिता आपल्या विद्यालयातील सोबत जोडलेल्या यादीत नमूद शिक्षकांची त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या विषयासाठी परीक्षक/नियामक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. याबाबतची लेखी सुचना सर्व संबंधित शिक्षकांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

शिक्षकास लिखीत उत्तरपत्रिकांच्या परीक्षण/समिक्षणाचे कार्य करणे अनिवार्य आहे.महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली नियम १९८१ मधील तरतूदीनुसार मंडळाचे परीक्षा विषयक गोपनीय काम करणे बंधनकारक आहे, तसेच अध्यापन व मुल्यांकन हा कर्तव्याचाच भाग आहे ,याची जाणीव सर्व संबधीत शिक्षकांना आपल्या स्तरावरुन करुन द्यावी व याबाबत संबंधितांनी ऐनवेळी अडचण निर्माण केल्यास नियमानुसार संबंधितावर कारवाई करण्यात येईल,याची जाणीव सुध्दा करुन देण्यात यावी. याबाबत आपण कटाक्षाने दक्षता घ्यावी.

तसेच खालील महत्त्वाच्या मुद्याकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

१) राज्य मंडळाच्या धोरणानुसार परीक्षेत बारकोड पध्दतीचा अवलंब केला जात असल्याने शिक्षकांचे पाल्य परीक्षेस प्रविष्ठ (Ward Appear) होत असले तरी संबंधितांना परीक्षक/नियामक म्हणून काम करता येईल या कारणास्तव नियुक्ती रद्द करता येणार नाही.

२) प्रत्येक शिक्षकाचे अस्तित्वात असलेले स्वतःचे भ्रमण दुरध्वनी क्रमांक, सेवानिवृत्ती दिनांक, विषय व माध्यम सोबतच्या यादीत त्यांच्या नावासमोर नमूद करणे बंधनकारक आहे,याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

३) सोबतच्या यादीतील शिक्षकांच्या नावासमोर एक किंवा एकापेक्षा जास्त अध्यापनाचे विषय आपणाकडून नमूद करण्यात आले असून त्यापैकी ज्या विषयाचे अध्यापन व मुल्यांकन करतात त्या विषयाला प्राधान्य देवून दुसऱ्या विषयाचे फक्त अध्यापन करतात, मुल्यांकन करीत नाही, असा अभिप्राय देण्यात यावा म्हणजे अध्यापन व मुल्यांकन विषयाचे परीक्षक म्हणून अंतिम नियुक्ती करणे सोईचे होईल.

४) सोबतच्या यादीतील शिक्षकांच्या नावासमोर नमूद असलेला विषय जर सदर शिक्षक शिकवित नसेल/अध्यापनाचे विषय वा माध्यम यात बदल असल्यास तसेच एखादा शिक्षक सेवानिवृत्त किंवा अन्य ठिकाणी बदली/समायोजन/स्थानांतर तसेच इतर कारणाने पॅनल मधील शिक्षकांचे संख्येत वाढ किंवा घट होत असल्यास सदर यादी दुरुस्तीसह प्रमाणित करुन मंडळ कार्यालयास तात्काळ हस्तपोच अथवा टपालाने पाठविण्यात यावी. आपल्या तसेच सोबत इयत्ता १० वी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे आपल्या शाळेचे वेळापत्रक जोडणे आवश्यक आहे.

सदर यादी आपल्यास्तरावर दप्तरी न ठेवता उपरोक्त सूचनेनुसार तपासून योग्यत्या दुरुस्त्या करुन तात्काळ मंडळ कार्यालयास सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी नियंत्रण अधिकारी म्हणून आपली राहील, याची नोंद घेण्यात यावी.

(श्रीराम चव्हाण)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

प्रत माहितीस्तव : १) शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग,नागपूर यांना सविनय सादराने अग्रेषीत.

२) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद,भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली व गोंदिया.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर-४४० ००१
दुरध्वनी क्र.इ.पी.बी.एक्स.०७१२-२५६५४०३/२५६०२०१/२५५३४०१/२५५३३६०फॅक्स-२५६१७७५
Email : nagpur@msbshse.ac.in web site- nagpureduboard.in
chavansk65@gmail.com


तातडीचे/कालमर्यादीत

पत्र क्रमांकः नाविमं/मागो/ 5876
नागपूर दिनांकः 19 /12/2017

प्रति,
मुख्याध्यापक
..........................................
..........................................

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०१८ करिता परीक्षक /नियामकांच्या नियक्ती बाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०१८ करिता आपल्या विद्यालयातील परीक्षक/नियामक म्हणून प्राप्त पॅनलमधील शिक्षकापैकी सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/मृत्यू असे कोणी शिक्षक असल्यास तसेच माहित्ती निरंक असल्यास तसे लिहून खालील तक्त्यामध्ये तयार करुन तात्काळ **chavansk65@gmail.com** मेलवर पाठवावीच.

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/मृत्यू असल्यास दिनांकासह कळवावे. |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

आपण पाठविलेल्या पॅनल मधील शिक्षकांना फायनल आदेश देवून नियुक्ती करण्यात येणार आहे.

(श्रीराम चव्हाण)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

प्रत माहितीस्तव : १) शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग,नागपूर यांना सादराने अग्रेषीत.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद,भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली व गोंदिया.